Maharashtra Education Society's
ABASAHEB GARWARE COLLEGE
Karve Road, Pune - 411 004. (INDIA)
● Best College Award - Pune University ● NAAC Reaccredited 'A' Grade ●
स्थापना १८६०
ज्ञानवृक्ष

Dr. Muktaja V. Mathakari
M.A. LL.B., Ph. D.
**PRINCIPAL**

I.D. No. PU/PN/A.S./009 (1945) / JR. COLLEGE CODE NO. 11.003
Tel.: 41038200 / 41038207 Fax : 41038233
E-mail : agccomp@eth.net ● Website : mesgarwarecollege.org

Ref. No.: Date : 9/5/2018

# द्वितीय वर्ष कला (S.Y.B.A.)& (S.Y.B.A)NGU प्रवेशाची सूचना

या महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०१७–१८ मध्ये प्रथम वर्ष कला या वर्गात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष २०१८–१९ साठीचे द्वितीय वर्ष कला शाखेचे प्रवेश दिनांक १६ मे २०१८ ते १८ मे २०१८ या कालावधीत होतील. प्रवेशाची पद्धत खालीलप्रमाणे राहील.

१. सर्व प्रवेश फक्त ऑनलाईन पद्धतीने होणार असून महाविद्यालयाच्या www.mesgarwarecollege.org / abasahebgarwarecollege.com या संकेत स्थळावर (students & parents - Admission-online admission form) ऑनलाईन प्रवेश अर्ज भरणे आवश्यक आहे.

२. सदर ऑनलाईन अर्ज करण्यापूर्वी प्रत्येक विद्यार्थ्याकडे स्वत:च्या फोटोची व सहीची जेपीईजी फाईल (सॉफ्ट कॉपी) असणे आवश्यक आहे. फोटो व सही अपलोड करून ऑनलाईन फॉर्म पूर्ण भरून त्याची प्रिंट घेणे आवश्यक आहे.

३. सदरच्या ऑनलाईन फॉर्म सोबत प्रथम वर्ष कला शाखा उत्तीर्ण झाल्याच्या गुणपत्रिकेची छायांकित प्रत, तसेच लागू असल्यास जातीच्या दाखल्याची छायांकित प्रत जोडून सदरचा अर्ज महाविद्यालयाच्या ए.व्ही. हॉल येथून संबंधित प्राध्यापकांकडून तपासून घ्यावा.

४. EBC/PTC/STC/Ex-Serviceman/Scholarship/Freeship इ. सवलतीसाठी वेगळे अर्ज करणे आवश्यक आहे. त्यासाठी श्रीमती पारवे सुजाता, कनिष्ठ लिपिक यांना भेटावे.

५. महाविद्यालयात संपूर्ण फी रोख स्वरूपात भरल्यानंतरच आपला प्रवेश निश्चित होईल याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. सोबत फी चा तपशील जोडला आहे.

६. प्रत्येक विशेषस्तर विषयांसाठी मर्यादितच जागा उपलब्ध असल्यामुळे प्रथम येणारास संबंधित विशेषस्तरावरील विषयांसाठी उपलब्ध जागेनुसार प्रवेश देण्यात येईल. संबंधित विषयांच्या जागेची मर्यादा संपल्यानंतर त्या विषयासाठीचा प्रवेश बंद करण्यात येईल.

७. द्वितीय वर्षासाठीचे प्रवेश हे फक्त या महाविद्यालयातून प्रथम वर्ष उत्तीर्ण झालेल्या/ ए.टी.के.टी. प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांसाठीच असतील. बाहेरील महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी द्वितीय वर्षाच्या प्रवेशासाठी ३० जून २०१८ नंतर चौकशी करावी. जागा उपलब्ध असल्यासच संबंधित प्रवेशाबाबत सूचना फलक / महाविद्यालय वेबसाईटवर सूचना लावण्यात येईल.

८. विनाअनुदानित इंग्रजी माध्यम तुकडीसाठीचे प्रवेश याच कालावधीत होतील. त्यासाठी प्रवेश अर्जावर संबंधित विभागप्रमुखांची स्वाक्षरी झालेनंतर ए.व्ही.हॉल मध्ये श्रीमती चैत्राली चौधरी यांचेकडून शुल्काचे चलन देण्यात येईल चलन घेवून त्याच दिवशी जनता सहकारी बॅंक कर्वे रोड येथे बॅंकेत पैसे भरुन चलनाची प्रत विनाअनुदानित विभागात जमा करुन प्रवेशाचे पैसे भरलेली पावती घ्यावी त्यावर विद्यार्थ्याने त्याचे नाव आणि रोल नं तपासून पहावा.

९.Scholarship/Freeship इ. सवलतीसाठी वेगळे अर्ज करणे आवश्यक आहे. त्यासाठी विनाअनुदानित विभागासाठी श्रीमती चैत्राली चौधरी यांना भेटावे.

१०. प्रवेश झाल्यानंतर त्याच ठिकाणी संबंधित विद्यार्थ्यांस ओळखपत्र देण्यात येईल.

(डॉ. मुक्तजा मठकरी)
for प्राचार्य

## द्वितीय वर्ष बी.ए.

बी. ए. विशेष स्तर पदवीसाठी विद्यार्थ्याने खाली दिलेल्या अटीनुसार विषय निवडायचे असतात.

१. इंग्रजी हा विषय अनिवार्य राहील. त्याशिवाय,

२. विद्यार्थ्याने प्रथम वर्ष बी.ए. ला निवडलेल्या इतर विषयांपैकी कोणतेही तीन विषय निवडता येतील. या तीन विषयांपैकी महाविद्यालयात विशेष स्तरावर शिकविल्या जाणाऱ्या विषयांपैकी एक विषय विशेष स्तरावरील विषय म्हणून (Special Subject) निवडायचा आणि इतर दोन विषय हे सामान्य विषय (General Subject) म्हणून घ्यावयाचे आहेत.

विशेष विषयाचे दोन पेपर्स (S-1) आणि (S-2) असे अभ्यासावे लागतील. तर साधारण पातळीवर तीन पेपर्स अभ्यासावयाचे आहेत. त्यापैकी एक पेपर हा विशेष विषयाचा व दोन साधारण विषयाचे असे एकूण सहा पेपर्स अभ्यासावयाचे आहेत.

<table>
<tr><th colspan="2">S.Y.B.A. मराठी माध्यम</th></tr>
<tr><td>'अ' तुकडी</td><td>'ब' तुकडी</td></tr>
<tr><td>इंग्रजी अनिवार्य</td><td>इंग्रजी अनिवार्य</td></tr>
<tr><td colspan="2">खालीलपैकी कोणताही एक स्पेशल पेपर<br>मराठी, हिंदी, इंग्रजी, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, मानसशास्त्र, भूगोल, इतिहास, समाजशास्त्र</td></tr>
<tr><td colspan="2">खालीलपैकी कोणतेही दोन सामान्य पेपर स्पेशल विषय सोडून<br>१. मराठी<br>२. हिंदी / अर्थशास्त्र<br>३. इतिहास<br>४. मानसशास्त्र / भूगोल<br>५. राज्यशास्त्र / ऐ. इंग्रजी / शिक्षणशास्त्र<br>६. समाजशास्त्र / तर्कशास्त्र<br>७. तत्वज्ञान</td></tr>
<tr><td colspan="2">पर्यावरण जाणीव जागृती हा विषय S.Y.B.A. साठी अनिवार्य आहे. या विषयात उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.</td></tr>
</table>

(डॉ. मुक्तजा मठकरी)

for प्राचार्य